# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. ५८९/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक २/११/२०१८


## हेल्मेट सक्ती – सामान्य नागरीकांना एक महिना मुदतवाढ

मोटर वाहन अपघांतामुळे होणारी जिवात व वित्त हानी टाळता यावी/कमी करता यावी याकरीता मोटर वाहन अपघांताच्या कारणांचा अभ्यास करण्याकरिता सर्वोच्च न्यायालयाने DIMTS या संस्थेची नेमणुक केलेली होती.सदर संस्थने मोटर वाहन अपघांताच्या कारणांचा अभ्यास करून एकुण १६० शिफारसी केलेल्या असुन सदर शिफारसींची अमलबजावणी करण्याचे आदेश शासनाकडुन प्रादेशिक परीवहन विभाग,पोलीस ,सार्वजनिक बांधकाम विभाग ईत्यादी शासकीय विभागांना केलेल आहेत.

सदर शिफारसीपैकी १)दुचाकी चालवितांना हेल्मेटचा वापर करने २) मोटर वाहन चालवितांना मोबाईल फोन वर न बोलने ३)मोटर वाहन चालवितांना शिटबेल्टचा वापर करने याबाबतचा नियमाचे काटेकोरपने अमलबजावणी करण्याचे आदेश प्रादेशिक परीवहन विभाग व पोलीसांना प्राप्त झाले आहेत त्यानुसार संपुर्ण देशमध्ये सदर नियमांचे काटेकोर अमलबजावणी करण्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आलेली आहे.

सदर मोहिमेचा पहीला टप्पा म्हनुण ज्या शासकीय विभागाकडुन सदर नियमांचे अमलबजावणी करण्यात येणार आहे. अशा पोलीस व प्रादेशिक परीवहन विभाग या दोन खात्यामध्ये सर्वप्रथम सदरची मोहिम काटेकोरपने राबविण्यात आलेली असुन विना हेल्मेट दुचाकी चालवितांना आढळुन आलेल्या एकुन ३२ पोलीसावंर कायदेशिर कारवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन प्रत्येकी ५००/–रू. प्रमाणे एकुन १६०००/–रू.दंड वसुल करण्यात आलेला आहे.

यापुढील टप्प्यामध्ये सदरची मोहिम जिल्हयातील अन्य शासकीय विभाग व सर्वसामान्य जनता याचे बाबत राभविण्यात येणार असुन त्यांना हेल्मेट खरेदी व वापराकरिता दिनांक ३०/११/२०१८ ही अंतीम मुदत ठरविण्यात आलेली असुन दिनांक ०१/१२/२०१८ रोजी पासुन जिल्हयात सदर मोहिमेची सर्वाकरिता काटेकोरपने अमलबजावणी करण्यात येणार आहे. त्या करिता पोलीस विभागाकडुन अन्य सर्व शासकिय विभाग,नगर परीषदा,पंचायत समित्या,ग्रामपंचायती इत्यादींना पत्र व्यवहार करून दुचाकी चालवितांना हेल्मेट वापर करण्याचे आवाहण करण्यात आले आहे.तसेच सर्व शासकीय कार्यालयाचे प्रवेश व्दारावर 'No Helmet No Entry ' सुचनाफलक लावण्या बाबत सुचना देण्यात आलया

असुन देशात काही ठिकाणी राबविण्यात येत असलेली **नो हेल्मेट नो पेट्रोल** ही संकल्पना जिल्हयातील पेट्रोलपंपावर राबविण्याबाबत विचार सुरू आहे.

मोटार वाहन कायदा कलम १२९ अन्वये विना हेल्मेट दुचाकी चालवितांना मिळुन आल्यास ५००/–रू. दंडाची तरतुद कायदया मध्ये आहे. तेव्हा सदर दंडाची रकमेत आणखी रूपये –शे– दोनशे रूपयाची भर घातल्यास आय.एस.आय. दर्जाचे हेल्मेट बाजारात उपलब्ध असुन दिनांक ३०/११/२०१८ रोजी पर्यत सर्व नांगरीकांनी हेल्मेटची खरेदी करावी. असे आवाहन जिल्हा पोलीस दलाकडुन करण्यात आलेली आहे.

सन २०१७ मध्ये जिल्हयातिल मोटार वाहन अपघाताची संख्या विचारात घेतल्यास जिल्हयात एकुन ४५८ मोटार वाहन अपघात झाले असुन सदर अपघाता मध्ये १४४ व्यक्तींचा मृत्यु झालेला आहे यापैकी ९० टक्के मृत्यु हे डोक्यास गंभीर ईजा पोहचल्याने झालेले असुन जर हेल्मेटचा वापर झालेला असता तर या सर्व व्यंक्तीचे प्राण वाचले असते. असे मत जिल्हा पोलीस अधिक्षक विनीता साहू यांनी व्यक्त केले असुन नागरीकांनी रस्त्यावर विक्रीस असलेली हेल्मेट ही तकलादु असुन त्याची खरेदी नकरता आय.एस.आय.दर्जाचे हेल्मेट खरेदी करावेत व सदर मोहिमेत पोलीसांना सहकार्य करावेत असे आवाहन त्यांनी केल आहे.

(जितेद्रं क्रे आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता